# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# गृहपाठ

## बी. ए. समाजिकशास्त्रे

### विशिष्ट सामाजिक प्रश्नांचा अभ्यास

(अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल याविषयांसाठी अनिवार्य पेपर)

तृतीय वर्ष (सत्र ५ व सत्र ६)

२०१७–१८

**प्रती : ६००**

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तर असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ५ व सत्र ६ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| सत्र | विना विलंबशुल्क | विलंब शुल्कासह |
|---|---|---|
| पाचवे | १५ ऑक्टोबर २०१७ | ३१ ऑक्टोबर २०१७ |
| सहावे | २८ फेब्रुवारी २०१८ | १५ मार्च २०१८ |

# विशिष्ट सामाजिक प्रश्नांचा अभ्यास (BADSE-506)

## सत्र – ५

## प्रकरण क्रमांक १ ते ५

## (अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल याविषयांसाठी अनिवार्य पेपर)

---

**प्र १. शिक्षण म्हणजे काय ते सांगून शिक्षण आणि विकास यातील परस्पर संबंध स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – शिक्षण विषयक संकल्पना थोडक्यात स्पष्ट करावी.

**शिक्षण म्हणजे काय?** – शिक्षणाचा अर्थ व व्याख्या लिहावी.

**शिक्षण आणि विकास** – अ) शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास ब) शिक्षण आणि सामाजिक विकास क) शिक्षण आणि आर्थिक विकास ड) शिक्षण आणि राष्ट्रीय विकास इ. मुद्दे सविस्तरपणे लिहावेत.

**समारोप** – शिक्षणाची गरज व महत्त्व सारांश रूपाने थोडक्यात लिहावे.

**प्र. २. औद्योगिकीकरण म्हणजे काय? परंपरागत भारतीय समाजात औद्योगिकीकरणामुळे कोणते परिवर्तन घडून आले?**

**प्रस्तावना** – औद्योगिकीकरण ही संकल्पना थोडक्यात लिहावी.

**औद्योगिकीकरण** – अर्थ व व्याख्या लिहिणे अपेक्षित आहे.

**औद्योगिकीकरणामुळे घडून आलेले सामाजिक परिवर्तन** – अ) व्यक्तीचा सामाजिक दर्जा व स्तरीकरण २) सामाजिकीकरण ३) परस्परावलंबन ४) कुटुंबव्यवस्था ५) शिक्षण ६) शासनाचा सहभाग ७) नोकरशाही ८) शहरीकरण इ. मुद्दे सविस्तरपणे लिहावेत.

**समारोप** – औद्योगिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा थोडक्यात आढावा घ्यावा.

**प्र. ३. औद्योगिकीकरणामुळे औद्योगिक क्षेत्रापुढे निर्माण झालेल्या समस्यांचा आढावा घ्या.**

**प्रस्तावना** – औद्योगिकीकरणाचा अर्थ व व्याख्या द्यावी.

**औद्योगिक क्षेत्रापुढील समस्या** – १) कामगार समस्या २) औद्योगिक संघर्ष ३) उद्योगांचे आजार इ. मुद्दे सविस्तर लिहावेत.

**समारोप** – काही सामाजिक जीवनातील समस्यांचाही थोडक्यात उल्लेख करावा.

**प्रश्न ४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**१) प्रचलित भारताच्या शिक्षण पद्धतीतील समस्या सांगा**

**समस्या पुढीलप्रमाणे** – १) शिक्षणाचे बाजारीकरण २) शिक्षणात राजकारणाचा प्रवेश ३) देणग्या

देण्याबाबतची सक्ती ४) इंग्रजी शाळांचे वाढलेले प्रस्थ ५) आकर्षक जीवनाकडे तरुण पिढीचा कल ६) परीक्षा पद्धतीतील त्रुटी ७) शैक्षणिक प्रसारातील विषमता इ. मुद्दे थोडक्यात स्पष्ट करावेत.

**समारोप –** वरील मुद्यांना अनुसरून सारांश रूपाने समारोप लिहावा.

**२) प्राथमिक शिक्षण पातळीवरील समस्यांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** प्राथमिक शिक्षणाविषयी थोडक्यात लिहावे.

**प्राथमिक शिक्षणातील समस्या –** प्रचंड विद्यार्थी संख्या, अपव्यय किंवा गळती, स्थगिती इ. मुद्दे स्पष्ट करावेत.

**समारोप –** प्राथमिक शिक्षणातील समस्या दूर करण्याच्या दृष्टीने काही उपाय लिहावेत.

**३) नागरीकरणाच्या समस्या विशद करा.**

**नागरीकरणाच्या समस्या –** घरांची टंचाई, गलिच्छ वस्त्या, पाणीटंचाई, वाहतूक व्यवस्थेवरील ताण, अशांत वातावरण, बाल कामगार व बाल गुन्हेगारी, प्रदूषण इ.

**समारोप –** वरील मुद्यांना अनुसरून सारांश रूपाने समारोप लिहावा.

**४) 'जलप्रदूषण' यावर टिपण तयार करा.**

जलप्रदूषणाची कारणे, जलप्रदूषण नियंत्रण आणि उपाय, जलप्रदूषण नियंत्रणासाठी असणारे कायदे इ. मुद्दे थोडक्यात स्पष्ट करावेत.

**प्रश्न ५. टिपा लिहा (कोणत्याही दोन)**

**१) शिक्षण आयोग (कोठारी आयोग)**

समाजात क्रांतिकारी परिवर्तन घडविण्यासाठी तीन गोष्टी. राष्ट्रीय उद्दिष्टे, आयोगाच्या शिफारशी इ. मुद्दे स्पष्ट करून लिहावीत.

**२) नवीन शैक्षणिक धोरण (१९८५–८७)**

नवीन शैक्षणिक धोरणाची आठ उद्दिष्टे लिहिणे अपेक्षित आहे.

**३) औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास**

शेती क्षेत्राच्या उत्पादकतेत वाढ, रोजगार संधीत वाढ, नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर, राहणीमानात सुधारणा, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ.

**४) पर्यावरणीय समस्या**

१) भूकंप २) ज्वालामुखी ३) अवर्षण ४) पूर ५) अणुप्रकल्प ६) वाढते नागरीकरण ७) ओझोन वायूचा क्षय इ.

## विशिष्ट सामाजिक प्रश्नांचा अभ्यास (BADSE - 606)

## सत्र – ६

## प्रकरण क्रमांक ६ ते १२

## (अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल याविषयांसाठी अनिवार्य पेपर)

---

**प्रश्न १. भारतासमोरील राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भातील समस्या विशद करा.**

**प्रस्तावना** – राष्ट्रीय एकात्मता आणि भारत याबाबत थोडक्यात सारांश रूपाने लिहा.

**समस्या** – १) सांस्कृतिक समस्या २) धार्मिक समस्या ३) जाति समस्या ४) प्रांतीयतेची समस्या ५) भाषा समस्या ६) अल्पसंख्याकांच्या समस्या इत्यादी समस्या विशद करणे.

**समारोप** – वरील समस्या भारतीय राष्ट्रीय एकात्मतेला कशा धोकादायक आहेत याचे थोडक्यात सारांश रूपाने लिहिणे अपेक्षित आहे.

**प्रश्न २. अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्या सांगा.**

**प्रस्तावना** – अनुसूचित जाती विषयक संकल्पना थोडक्यात लिहावी.

**अनुसूचित जातींच्या समस्या** – अ) सामाजिक समस्या : अस्पृश्यता, शिक्षण, आरोग्य, धर्म इ. ब) आर्थिक समस्या : दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, रोजगार, वेठबिगारी इ. क) राजकीय समस्या : संघटनात्मक समस्या, पक्षीय समस्या, दलित पँथर, नेतृत्व, विधायक भूमिका इ.

**समारोप** – वरील समस्यांवरील उपायांचा उल्लेख थोडक्यात करावा.

**प्रश्न ३. स्त्रियांच्या समस्यांची चर्चा करा. त्यावरील उपाय सुचवा.**

**प्रस्तावना** – स्त्रियांना समान हक्क असताना देखील आजही स्त्रियांवर अन्याय होतो. या विषयी स्त्रियांच्या विविध समस्यांचा थोडक्यात उल्लेख करावा.

**स्त्रियांच्या समस्या** – अ) सामाजिक समस्या ब) आर्थिक समस्या क) राजकीय समस्या. वरील सर्व समस्या सविस्तरपणे लिहिणे अपेक्षित आहे.

**उपाययोजना** – घटनात्मक उपाययोजना, शासकीय कायदे, विविध योजना, स्त्रीमुक्ती चळवळ व स्वयंसेवी संस्था इ. मुद्दे लिहिणे.

**समारोप** – वरील समस्या व उपाय यांच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

**१) राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात प्रसारमाध्यमांची भूमिका स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** प्रसारमाध्यमांचा प्रभाव थोडक्यात स्पष्ट करणे.

**प्रसारमाध्यमांची भूमिका –** वृत्तपत्रे, नभोवाणी, दूरदर्शन, चित्रपट इत्यादी प्रसारमाध्यमांची कार्ये विशद करणे.

**समारोप –** राष्ट्रीय एकात्मतेबाबतची मूल्ये प्रसारमाध्यमांद्वारे समाजमनावर ठसवली जातात.

**२) भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेच्या तरतुदी स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** भारतीय राज्यघटना आणि धर्मनिरपेक्षता या मुद्द्यांच्या अनुषंगाने प्रस्तावना लिहिणे.

**तरतुदी –** १) धार्मिक स्वातंत्र्य २) नागरिकत्व ३) राज्य व धर्म फारकत ४) धर्मप्रसार इत्यादी मुद्द्यांच्या अनुषंगाने प्रस्तावना लिहिणे.

**समारोप –** वरील मुद्द्यांच्या आधारे सारांश रूपात समारोप लिहिणे.

**३) हिंदू धर्मातील धर्मनिरपेक्षतेस अनुकूल बाबी कोणत्या?**

**प्रस्तावना –** हिंदू धर्माविषयी थोडक्यात लिहिणे.

**अनुकूल बाबी –** १) हिंदू धर्मनिरपेक्षतेस अनुकूल घटक लिहिणे २) हिंदू धर्मनिरपेक्षतेस प्रतिकूल घटक लिहिणे.

**समारोप –** वरील घटकांच्या आधारे सारांश लिहिणे.

**४) आदिवासींच्या समस्यांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** आदिवासींचा अर्थ, त्यांची जीवन पद्धती याबाबत थोडक्यात लिहिणे.

**आदिवासींच्या समस्या –** १) आर्थिक समस्या २) सामाजिक समस्या ३) राजकीय समस्या इ. समस्या थोडक्यात लिहिणे.

**समारोप –** आदिवासींच्या समस्यांवरील उपाय थोडक्यात लिहा.

**प्रश्न ५. टिपा लिहा (कोणत्याही दोन)**

**१) शासन आणि धर्मनिरपेक्षता**

शासनाची अनुकूल व प्रतिकूल भूमिका लिहिणे.

**२) आदिवासी कल्याण कार्यक्रम**

**प्रस्तावना –** आदिवासींच्या समस्यांचा थोडक्यात उल्लेख करावा.

**आदिवासी कल्याण कार्यक्रम –** पंचवार्षिक योजनांद्वारे आदिवासी कल्याणासाठी योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्या योजना लिहिणे. १) आर्थिक योजना २) शैक्षणिक योजना ३) आरोग्य इ. मुद्दे स्पष्ट करणे

**समारोप –** वरील माहितीच्या आधारे सारांश लिहावा.

**३) अपंगांच्या सर्वसाधारण समस्या**

**प्रस्तावना –** अपंगत्वाचे प्रकार थोडक्यात लिहावेत.

**अपंगांच्या समस्या –** शैक्षणिक समस्या, रोजगारविषयक समस्या, सामाजिक प्रतिष्ठा, विवाहविषयक समस्या, संघटनात्मक प्रश्न इत्यादी.

**समारोप –** अपंगांच्या समस्येवरील उपाय थोडक्यात सुचवा.

**४) वृद्धांच्या समस्या.**

**प्रस्तावना –** वृद्धत्वाची व्याख्या व अर्थ लिहिणे अपेक्षित.

**समस्या –** आर्थिक समस्या, शारीरिक समस्या, मानसिक समस्या, सामाजिक समस्या इत्यादी.

**समारोप –** वृद्धांच्या समस्यांवरील उपाययोजना थोडक्यात लिहा.

✻✻✻